11 Sep FRONT PAGE_Layout 1 9/11/2026 4:51 PM Page 1


सायंदैनिक

# गुड इव्हिनिंग City

goodeveningcity@gmail.com

www.goodeveningcity.com

११ सप्टेंबर २०२६, शुक्रवार | वर्ष १५ वे | अंक १३९ | पृष्ठे ६



**योजनेमध्ये मोफत उपचार व शस्त्रक्रिया**
**बुलडाणा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल**
क्रिटीकल केअर व ट्रॉमा सेंटर

पत्ता :- आरास ले आऊट, जांभरूण रोड, बुलडाणा (24 तास सेवा उपलब्ध)
मो. 7575919191, 7575929292, 7575939393, 9096354891

(MJPJAY) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, (PMJAY)
प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना संलग्नित

**संपुर्ण गटातील कुटूंबासाठी संपूर्ण प्रकाराच्या आजारांवरती मोफत व गुणवत्तापुर्ण उपचार व शस्त्रक्रिया इ.**

**खालील आजारावरील सुविधा संपूर्ण मोफत**

1) नवजात बाळाचे आजार (NICU)
2) लहान मुलांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (PICU)
3) मोठ्या मानसांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (मेडिसिन ICU)
4) श्वासाचे आजार / मेंदुचे आजार व शस्त्रक्रिया.
5) किडनिचे आजार व मुतखड्याची शस्त्रक्रिया.
6) पोटाचे आजार व शस्त्रक्रिया तसेच दुर्बिनद्वारे शस्त्रक्रिया (Laproscopy)
7) अस्थिरोग विभाग व शस्त्रक्रिया
8) ट्रॉमा व एक्सीडेंट सर्जरी व उपचार
9) स्त्रिरोग व प्रसुतीरोग उपचार व शस्त्रक्रिया.
10) कान, नाक, घसा उपचार व शस्त्रक्रीया.
11) दंतरोगाची सर्जरी व उपचार
12) कॅन्सर उपचार, शस्त्रक्रिया इत्यादीची सुविधा

**योजनेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे - आयुष्यमान कार्ड**

टिप - बुलडाणा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल मध्ये आयुष्यमान कार्ड काढून मिळेल


# मंत्रालयातील ५७० कर्मचाऱ्यांची मूळ विभागात हकालपट्टी; मंत्र्यांमध्ये नाराजी




**मुंबई, ११ सप्टेंबर (वृत्तसंस्था) :** मुख्यमंत्री कार्यालयाने मोठा निर्णय घेतला असून मंत्रालयातील ५७० कर्मचाऱ्यांची मूळ विभागात हकालपट्टी करण्यात आली आहे. मंत्रालयातील मंत्री आस्थापनांमध्ये शिफारस, उसनवारी आणि मौखिक पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा एकदा त्यांच्या मूळ विभागात पाठवण्यात आलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार तात्पुरत्या स्वरुपात घेण्यात आलेल्या या कर्मचाऱ्यांसाठी १० सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. त्यामुळे ही मदत संपली असून त्यांना परत त्यांच्या त्यांच्या मूळ विभागात रवानगी करण्यात आली आहे. शासनाच्या या कठोर भूमिकेमुळे मंत्र्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. मुख्यमंत्री कार्यालयाचा निर्णय असल्याने वैयक्तिक मर्जीतील अधिकाऱ्यांऐवजी आता मुख्यमंत्री कार्यालय रितसर पडताळणी करूनच नवीन नियुक्त्या करणार आहे, असं स्पष्ट करण्यात आलंय.

महत्त्वाचे म्हणजे या ५७० कर्मचाऱ्यांनी मूळ विभागात कामावर रुजू न झाल्यास त्यांना सप्टेंबर महिन्याचा पगार रोखण्याचे आदेशही मुख्यमंत्री कार्यालयातून देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे काही मंत्र्यांच्या खाजगी सचिवांनाही मूळ विभागात पुन्हा रुजू होण्याचे आदेश मिळाले आहेत.

मंत्रालयातील मंत्री आस्थापनेवर एकूण ९०४ पदांची मर्यादा देण्यात आली आहे. त्यानुसरा आतापर्यंत ५४९ अधिकारी आणि कर्मचारी प्रतिनियुक्तीने रुजू करण्यात आले होते. याचा अर्थ ३५५ पदं हे रिक्त होते. या पदांवर उसनवारी तत्वाने घेतलेले ५७० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आता कमी करण्यात आले आहेत. त्यामुळे मंत्र्यांमध्ये मोठी नाराजी वाढल्याचे बोलं जातंय.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यमंत्री आणि मंत्र्यांच्या कार्यालयांमध्ये किती कर्मचारी असा–वेत, याबद्दल एक निश्चित आकडा ठरवण्यात आला आहे. त्यामुळे आता पुढे पद मर्यादेची अधिक काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे मंत्री आस्थापनांवरील अतिरिक्त मनुष्यबळाला लगाम बसण्याची चिन्हे असल्याचे राजकीय तज्ज्ञांचं मत आहे.

# भाजप नगरसेवक आकाश दळवी यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल



**बुलढाणा, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** शहरातील कारंजा चौक परिसरातील तिरुपती मंगल कार्यालयासमोर ८ सप्टेंबर रोजी रात्री झालेल्या वादातून एका कुटुंबाच्या घरात घुसून मारहाण, तोडफोड, शिवीगाळ व विनयभंग केल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिसांनी आकाश दळवी, प्रकाश उर्फ टिल्लू गोरले यांच्यासह १० ते १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, गोगाजी महाराजांची मिरवणूक पाहून शर्मा कुटुंबीय रात्री सुमारे १० वाजता घरी परतले. कुटुंबीय जेवण करत असताना संशयित आरोपी घरासमोर आले. त्यांनी तेथे उभी असलेली मोटरसायकल खाली पाडून तिचे नुकसान केले. त्यामुळे घाबरलेल्या कुटुंबीयांनी घराचा दरवाजा बंद करून घेतला. यानंतर आरोपींनी दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. पती, सासरे, सासू आणि मुलांना शिवीगाळ करीत मारहाण व लोटपाट केल्याचे तक्रारीत नमूद आहे. कुटुंबातील वाद सोडविण्यासाठी महिला पुढे आल्या असता, आरोपी आकाश दळवी याने त्यांचा हात पकडून विनयभंग केल्याचा आरोप आहे. तसेच जिवे मारण्याची धमकी देऊन आरोपी तेथून निघून गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या घटनेनंतर संबंधित महिलेने बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी मारहाण, तोडफोड, विनयभंग आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास बुलढाणा शहर पोलीस करीत आहेत. या पोलीस तपासात काय निष्पन्न होते याकडे सर्वांचे लक्ष लागले असून या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्येही चर्चेला उधाण आले असून, पोलिसांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# गणेशोत्सवातील मद्यबंदीवर उच्च न्यायालय नाराज

## पुणे प्रशासनाला खडेबोल; 'आदेश मागे घ्या, अन्यथा न्यायालयीन हस्तक्षेप'

**मुंबई, ११ सप्टेंबर (वृत्तसंस्था) :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात लागू करण्यात आलेल्या मद्यविक्री बंदीवर मुंबई उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. केवळ एका जिल्ह्याला लक्ष्य करून उत्सवाच्या काळात दीर्घकाळ मद्यविक्री बंद ठेवण्याचा निर्णय अतार्किक व मनमानी असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

पुण्यात गणेश चतुर्थी आणि अनंत चतुर्दशीला मद्यविक्री बंद ठेवण्यासह काही ठिकाणी सलग १२ दिवसांची बंदी लागू करण्यात आली आहे. यावर सुनावणीदरम्यान मुंबई व राज्यातील इतर भागांत अशी व्यापक बंदी नसताना केवळ पुणे जिल्ह्याची निवड का करण्यात आली, असा सवाल खंडपीठाने उपस्थित केला. एखादी व्यक्ती उत्सवाच्या काळात मद्यपान करून आनंद साजरा करत असेल, तर त्यामुळे आपोआप कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईलच, असे म्हणता येणार नाही, असे तोंडी निरी–क्षणही न्यायालयाने केले. प्रशासनाने संबंधित आदेश मागे घ्यावा, अन्यथा न्यायालयीन हस्तक्षेप करावा लागू शकतो, असा इशारा खंडपीठाने दिला.

# कोरडा दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्या : नरेश शेळके




**बुलढाणा, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** गेल्या महिन्याभरापासून जिल्ह्यामध्ये पाऊस पडला नाही, त्यामुळे खरिपाचे सर्व पीक करपून गेली आहेत. शासनाने तत्काळ संपूर्ण जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करावा असे नरेश शेळके यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे केलेल्या निदर्शने व निवेदन प्रसंगी म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार जिल्हा बुलढाणा या पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासाठी निदर्शने करण्यात आली व शासनाला पक्षाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले की, यावर्षी खरीप हंगामामध्ये उशिरा पावसाला सुरुवात झाली. पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणी केली, आणि त्यावर लगेच झालेल्या मुसळधार पावसाने पेरलेले बियाणे वाहून किंवा दबून गेले. शिवाय जिल्ह्यामध्ये यावर्षी बऱ्याच प्रमाणात बोगस कंपनीचे बियाणे देखील शेतकऱ्यांना विकल्या गेले त्यामुळे पेरणी केलेले बियाणे उगवलेच नाही. तीन, चार वेळेस अनेक शेतकऱ्यांना खरिपाची पेरणी करावी लागली. जेमतेम पिकाची परिस्थिती सुधारायला लागली तर, गेल्या महिनाभरापासून पाऊस पडला नाही. त्यामुळे आज रोजी जिल्ह्यातील पूर्णतः खरीप पिके हे पाण्याअभावी वाळून गेले आहेत. पावसाच्या पाण्याअभावी वाळून गेल्याने शेतकरी हतबल झाला आहे. तरी आम्ही आपणास या निवेदनाद्वारे विनंती करतो की बुलढाणा जिल्ह्यामध्ये तात्काळ कोरडा दुष्काळ शासनाने जाहीर करावा. शेतकऱ्यांना किमान हेक्टरी ५० हजार रुपये दुष्काळी मदत म्हणून जाहीर करावी. शेतकऱ्याचा रखडलेला पिक विमा तात्काळ द्यावा. कृषी पंपांची बिले माफ करून शेतकऱ्यांना दिवसा पूर्ण दाबाने वीज उपलब्ध करून द्यावी. या घोषणा शासनाने तत्काळ कराव्यात व शेतकऱ्यांना या संकटातून वाचवावे. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने बळीराजासाठी मोठे ज्यांना आंदोलन हाती घेतल्या जाईल, याची सर्वस्व जबाबदारी शासनाची व प्रशासनाची राहील ही विनंती. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष नरेश शेळके सह प्रदेश सरचिटणीस बीटी जाधव, प्रदेश सदस्य तात्या कृपाळ, चिखली विधानसभा क्षेत्र प्रमुख डॉ. ज्योतीताई खेडेकर, जिल्हा उपाध्यक्ष पी. एम. जाधव, ह भ प शंकर महाराज, सतीश बाहेकर, सदानंद तेजनकर, महादेवराव शेळके, गजानन वायाळ, रामभाऊ खेडेकर, राष्ट्रीय प्रदेश महिला सदस्य नाझीमाताई खान, महिला जिल्हाध्यक्ष वर्षाताई इंगळे, व्हि.एन. टी. जिल्हाध्यक्ष गणपतराव कुसळकर, ओबीसी जिल्हा अध्यक्ष गजाननराव भिवसनकर, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष प्रशांत डोंगरदिवे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष सईद इकबाल, तालुका अध्यक्ष सुनील सोनवणे, मन्नान पठाण, बाळासाहेब पवार, निलेश चव्हाण, ज्ञानेश्वर वायाळ, विठ्ठलराव मोरे, शेषराव पाटील कानडे, डॉ. विकास मिसाळ यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.


इंदीरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था बुलडाणा व्दारा सचंलित

**डॉ. राजेंद्र गोडे नर्सिंग इंन्स्टिटयुट, सागवन, बुलडाणा**

महाराष्ट्र शासन, इंडियन नर्सिंग कौन्सील नवी दिल्ली, महाराष्ट्र परिचर्या परीषद, मुंबई महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याशी संलग्न

Website :- https://drgni.ac.in Email:- conbuldana@gmail.com

**शैक्षणिक सत्र २०२६-२७ प्रथम वर्ष पोस्ट बेसिक.बी.एस्सी नर्सिंग**

**प्रवेश सूचना**

पोस्ट बेसिक बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्हताप्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| वेळापत्रक | दिनांक |
|---|---|
| प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम दिंनाक | १०/०९/२०२६ ते २५/०९/२०२६ |
| तात्पुरती गुणवत्ता यादी. | २८/०९/२०२६ सकाळी १०.०० |
| अंतिम गुणवत्ता यादी. (अंतिम निवड यादी) | २८/०९/२०२६ सकाळी ११.०० |
| रिक्त जागा तपशिल | २८/०९/२०२६ संध्याकाळी ०५.०० |
| प्रतिक्षा यादी | २८/०९/२०२६ संध्याकाळी ०५.०५ |
| प्रवेश घेण्याचा अतिंम दिनांक (सर्व मुळ कागदपत्रे आणि आवश्यक शुल्क घेउन महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश घेणे अनिवार्य आहे.) | २९/०९/२०२६ सकाळी ११.०० ते संध्याकाळी ०५.०० |

Seat Matrix

| Category Wise Seats | Constitutional Reservation Category | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SC | ST | VJ | NT 1 | NT 2 | NT 3 | OBC | SEBC | EWS | OPEN | 15% Inst | Total |
| | 03 | 02 | 01 | 01 | 01 | 0 | 05 | 05 | 05 | 27 | 0 | 50 |

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक याच्या नियमा नुसार प्रवेश देणे सुरू आहे.**

प्रवेशासाठी संपर्क :– **प्राचार्य डॉ. राजेंद्र गोडे नर्सिंग इंन्स्टिट्युट, सागवन, बुलडाणा**
जुना अजिसपूर रोड राजेंद्र नगर सागवन. ता. जि.बुलडाणा. मो. नंबर :– ९५६१४७७२६१/९८३४०९८७७०


गुड इव्हिनिंग City | बातम्या तसेच जाहीरातीसाठी संपर्क | प्रकाशक : रणजीतसिंग राजपूत ९८५०३७७३४४ | संपादक : ॲड. हरीदास उंबरकर ९७६३४६९१८४ // गुड इव्हिनिंग सिटी सोशल मिडीयावर सुद्धा... किंमत १ रू.

महाराष्ट्र शासन

# प्रारंभीक अधिसुचना

क्र. भुसंपादन/कावि/२७५७ /२०२६
उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी
कार्यालय मलकापुर दिनांक :- २४/०८/२०२६
भुसंपादन प्रकरण क्रमांक ०२/चांदूरबिस्वा/ २०२६-२७

## भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना.

ज्याअर्थी भुमिसंपादन, पुर्नवसन व पुनर्स्थापना वाजवी भरपाई मिळण्याचा व पार दर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम ३ च्या खंड ई च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना महसुल व वनविभाग संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२/ दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात पुढे जिचा निर्देश उक्त अधिसुचना असा करण्यात आलेला आहे) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, जिचा उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (खंड ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हातील १००० पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमिन संपादन करण्याच्या संबंधात अश्या जिल्हाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

उक्त अधिनियमाच्या समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हातील जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसुची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन (यात यापुढे जिचा उल्लेख उक्त जमिन असा करण्यात आलेला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश सार्वजनिक प्रयोजनासाठी असा करण्यात आलेला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसुची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदी याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनीक प्रयोजनाकरीता आवश्यक भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी प्रस्तावित भुमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनुसुची तिन मध्ये दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रयोजनाकरीता नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसुची पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण ४ खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यत उक्त जमिनीवर अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अश्या मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडुन भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम ५ अनुसार जिल्हाधिकारी भुमिसंपादन, पुर्नवसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ ( यांत पुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आलेला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भुमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्या अर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी मलकापुर यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-१

भुसंपादन प्रकरण क्रमांक ०२/चांदूरबिस्वा/२०२५-२६
(जमिनीचे वर्णन)

मौजे : चांदूरबिस्वा    तालुका : नांदूरा    जिल्हा : बुलढाणा

| अ.क्र | गावाचे नांव | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | चांदूरबिस्वा | १५५ | ०.०६ |
| २ | चांदूरबिस्वा | १५८ | ०.०४ |
| ३ | चांदूरबिस्वा | १५९ | ०.०७ |
| ४ | चांदूरबिस्वा | १६१ | ०.०८ |
| ५ | चांदूरबिस्वा | १६४ | ०.०९ |
| ६ | चांदूरबिस्वा | १६५ | ०.११ |
| ७ | चांदूरबिस्वा | १६८ | ०.०४ |
| ८ | चांदूरबिस्वा | १६९ | ०.०५ |
| ९ | चांदूरबिस्वा | १७० | ०.०४ |
| १० | चांदूरबिस्वा | १७४ | ०.१० |
| ११ | चांदूरबिस्वा | १७५ | ०.१३ |
| १२ | चांदूरबिस्वा | १७६ | ०.०७ |
| १३ | चांदूरबिस्वा | १७७ | ०.०७ |
| १४ | चांदूरबिस्वा | १८० | ०.०५ |
| १५ | चांदूरबिस्वा | १८१ | ०.१२ |
| १६ | चांदूरबिस्वा | १८५ | ०.१६ |
| १७ | चांदूरबिस्वा | १८६ | ०.१९ |
| १८ | चांदूरबिस्वा | १८७ | ०.७२ |
| १९ | चांदूरबिस्वा | १८८ | ०.०३ |
| २० | चांदूरबिस्वा | १८९ | ०.०६ |
| २१ | चांदूरबिस्वा | १९० | ०.०६ |
| २२ | चांदूरबिस्वा | १९१ | ०.०७ |
| २३ | चांदूरबिस्वा | १९२ | ०.१२ |
| एकणू क्षेत्र | | | २.५३ |

## अनुसूची-२

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरणपत्र

प्रकल्पाचे नांव :- जिगांव प्रकल्प, ता. नांदूरा, जि. बुलडाणा

संपादनाचे प्रयोजन :- जिगांव प्रकल्प उपसा सिंचन योजना क्र. १२ चे दाबयुक्त बंदिस्त नलिका प्रणाली कामाच्या पंपगृहाचे पोहोच रस्त्याकरीता मौजा चांदूर बिस्वा ता. नांदूरा, जि. बुलडाणा येथील संपादित करण्यात येणा-या खाजगी जमिन क्षेत्राचा प्रस्ताव.

प्रकल्प कार्यालयाचे वर्णन :- कार्यकारी अभियंता, जिगांव उपसा सिंचन विभाग, खामगांव

समाजाला मिळणारे लाभ :- प्रकल्पा अंतर्गत, जिगांव प्रकल्प उपसा सिंचन योजना क्र. १२ चे दाबयुक्त बंदिस्त नलिका प्रणाली कामाच्या पंपगृहाचे पोहोच रस्त्याकरीता मौजा चांदूर बिस्वा ता. नांदूरा, जि. बुलडाणा भूसंपादन करुन सिंचन सुविधा/दळणवळण सुविधा निर्माण करणे.

## अनुसूची-३

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :

सदर प्रकल्पा अंतर्गत, मौजा चांदूरबिस्वा ता. नांदूरा येथील भूसंपादन जिगांव प्रकल्प उपसा सिंचन योजना क्र. १२ चे दाबयुक्त बंदिस्त नलिका प्रणाली कामाच्या पंपगृहाचे पोहोच रस्त्याकरीता असल्याने यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गांवठाण बाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापीत होत नसल्यामुळे तसेच पोच रस्ता असल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची-४

सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश :

अतिरीक्त संचालक भारत सरकार, पर्यावरण मंत्रालय, पर्यावरण भवन, लोधी रोड, नवी दिल्ली ११०००३ क्र. जे. १२०११-२२ २००७ आयएआय दिनांक ११/०५/२००७ अन्वये पर्यावरण सर्वेक्षण मंजुरी झालेली असल्यामुळे भुसंपादन अधिनीयम २०१३ चे कलम ०६ चे परंतुक २ अन्वये सामाजिक परीणाम निर्धारण लागु होत नाही.


उर्वरित पान क्र.५ वर

गुड इव्हिनिंग City

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## सिमकार्ड नसतानाही करा इमर्जन्सी कॉल




तुमच्या मोबाईलमध्ये बऱ्याचदा नेटवर्क न मिळण्याच्या समस्येचा सामना तुम्ही केला असेल यात शंका नाही. मात्र ज्यावेळी मोबाईमध्ये नेटवर्क नसते तेव्हा तुम्हाला इमर्जन्सी कॉल करण्याचा पर्याय मिळतो. कोणत्याही नेटवर्कशिवाय तुम्ही इमर्जन्सी नंबरवर कॉल करू शकता. इमर्जन्सी कॉलमध्ये तुम्ही पोलीस, रुग्णवाहिका इत्यादी ठिकाणी कॉल करू शकता. पण, फोनमध्ये नेटवर्क नसतानाही इमर्जन्सी कॉल कसा केला जातो ? असा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. याच प्रश्नाचं उत्तर आज आम्ही तुम्हाला देणार आहोत. चला तर मग जाणून घेऊया फोनमध्ये नेटवर्क नसतानाही कॉल कसा कनेक्ट केला जातो.

### असा जोडला जातो फोन

जेव्हा तुमच्या फोनमध्ये कोणतेही नेटवर्क नसते, याचा अर्थ तुमचा फोन ऑपरेटर नेटवर्कशी तुम्ही जोडले जाऊ शकत नाही. या परिस्थितीत इमर्जन्सी कॉल दुसऱ्या मार्गाने जोडला जाऊ शकतो. वास्तविक, जेव्हा तुमचा फोन त्याच्या ऑपरेटरच्या नेटवर्कशी कनेक्ट होत नाही, त्यावेळी तो त्या भागात उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही मोबाइल नेटवर्कशी कॉल कनेक्ट करण्याचा प्रयत्न करतो. या परिस्थितीत इमर्जन्सी कॉल कोणत्याही नेटवर्कद्वारे कनेक्ट केले जाऊ शकतात. त्यामुळे अशा परिस्थितीत, जेव्हा सामान्य कॉल करता येत नाहीत, तेव्हा इमर्जन्सी कॉल कनेक्ट केला जातो. शिवाय जेव्हा कधी तुम्ही इमर्जन्सी कॉल करता तेव्हा सर्वात आधी तो कोणत्याही नेटवर्कचा वापर करून कनेक्ट करता येईल यालाच प्राधान्य दिले जाते. अशावेळी कोणत्यातरी ठराविक नेटवर्कद्वारेच फोन कनेक्ट करणे गरजेचे नसते. त्यामुळे प्रत्येक परिस्थितीत इमर्जन्सी कॉल करता येतो.

### कॉल कसा कनेक्ट होतो ?

तुम्ही इमर्जन्सी कॉल करता तेव्हा तो कॉल कसा रिसिव्ह केला जातो, याबाबतची माहिती जाणून घेऊया. तुम्ही जेव्हा एखाद्याला इमर्जन्सी कॉल करता तेव्हा आधी फोनद्वारे तो मेसेज जवळच्या नेटवर्क सर्व्हिस प्रोव्हायडर टॉवरला जातो आणि तिथून तुम्हाला कॉल करायचा असलेल्या टॉवरपर्यंत मेसेज पोहोचतो आणि तुमचा कॉल संबंधित फोनशी जोडला जातो. हे काम काही क्षणात पूर्ण होते आणि तुम्ही कोणाशीही इमर्जन्सी संवाद साधू शकता.






## Daam ने काढला दम!

### अँड्रॉइडसाठी धोकादायक ठरणारा व्हायरस

तंत्रज्ञान जेवढे प्रगत होत आहे, तेवढेच ते धोकादायक ठरत आहे. नॅशनल सायबर सिक्युरिटी एजन्सीने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये 'Daam' या नवीन आलेल्या व्हायरसपासून अॅण्ड्रॉइडला धोका असल्याचे सांगितले आहे. तेव्हा 'Daam' व्हायरस काय आहे आणि त्यापासून आपला फोन कसा सुरक्षित ठेवता येईल, जाणून घेऊया...




### असणारा धोका

व्हायरस स्कॅनिंग, सिक्युरिटी, अॅण्टीव्हायरस सिस्टीम अशा व्हायरसरोधक कार्यप्रणाली या 'Daam' व्हायरसला रोखू शकत नाहीत. हा व्हायरस सर्व परवानग्या आणि अॅण्टीव्हायरस प्रणाली सहज पार करतो. त्यानंतर तुमच्या फोनचा कॅमेरा, कॉल्स, कॉल लॉग, सर्च हिस्ट्री, बुकमार्क्स या प्रकारची वैयक्तिक माहिती हॅक करतो. तुमच्या अॅण्ड्रॉइड फोनमधील कॉन्टॅक्ट्स आणि कॅमेरादेखील हा व्हायरस हॅक करतो. यासोबत मोबाइलमधील पासवर्ड बदलणे, स्क्रीनशॉट घेणे, एसएमएस रीड करणे, फाइल्स अपलोड आणि डाऊनलोड करून C2 सर्व्हरला पाठवणे, असेही या व्हायरसमुळे घडू शकते. 'Daam' व्हायरस तुमच्या मोबाइलमधील डेटा आणि फाइल्स ओळखण्यासाठी मालवेअर अॅडव्हान्स इन्क्रिप्शन सिस्टीमचा वापर करतो. या इनक्रिप्टेड फाइल्सना '.enc' असे पुढे लिहिलेले दिसते. या फाइल्सव्यतिरिक्त इतर सर्व डेटा हा व्हायरस डिलीट करून टाकतो. यासोबतच 'readme_now.txt' नावाची एक नोट हा मालवेअर तुमच्या फोनमध्ये ठेवतो. या व्हायरसमुळे तुमच्या मोबाइलमधील डेटा चोरी होतो.

### काळजी कशी घ्याल ?

इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम (CERT-IN) ने 'Daam' पासून फोन सुरक्षित राखण्यासाठी काही मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. गूगल किंवा अधिकृत अॅप्स स्टोअरमधून अॅप्स डाऊनलोड करा. तसेच आपल्याला हव्या असणाऱ्या अॅपची पूर्ण माहिती डाउनलोड करण्याआधी वाचून घ्या. तसेच रिव्ह्यू बघून घ्या. त्या अॅपला आवश्यक तेवढ्याच परवानग्या (allow) द्या. अॅण्ड्रॉइडचे अधिकृत अपडेट्स जेव्हा येतील तेव्हा फोन अपडेट करून घ्या. विश्वास नसलेल्या वेबसाइट्स ओपन करू नका. तसेच अनावश्यक लिंक्स ओपन करून बघू नका. परदेशातून येणारे अनोळखी कॉल, मेसेज तसेच संशयास्पद मोबाइल नंबर वाटल्यास त्यांच्यापासून लांब राहा. सुरक्षित असणाऱ्या यूआरएलवर क्लिक करा. कोणत्याही अॅपची सुरक्षितता तपासून घ्या. वेबसाइट्सवरील सर्वच 'कुकीज' स्वीकारू नका. माहीत नसलेल्या पैसे किंवा बक्षिसांच्या ऑफर स्वीकारू नका.

### अनोळखी क्रमांकापासून सावध राहा

बँक किंवा अन्य कंपन्यांचे शॉर्टफॉर्म्स वापरून अनोळखी क्रमांकावरून मेसेज येऊ शकतात. ते काही लिंकही मेसेजमध्ये देतात. माहीत नसलेल्या किंवा http नसलेल्या लिंक ओपन करू नका. bitly किंवा tinyurl अशी लघू स्वरूपातील लिंक ओपन करू नका. यामुळे व्हायरस तुमच्या फोनमध्ये शिरू शकतो. तुमचा फोन अधिकृत अपडेट नोटिफिकेशन आल्यावर अपडेट करा आणि फोन सुरक्षित ठेवा.

गुड इव्हिनिंग City

# निरामय

# वाढवा स्मरणशक्ती!



**स्मरणशक्ती वाढवण्यासाठी आहारापासून व्यायामापर्यंत अनेक गोष्टी उपयोगी पडतात. व्यायामानंतर लगेच डुलकी काढल्यानं स्मरणशक्तीसाठी वाढण्यास मदत होते, असं अनेक संशोधनांती सिद्ध झालं आहे. स्मरणशक्ती वाढवण्यासाठी काय केलं पाहिजे, याविषयी...**

■ विचार करताना : आपले डोळे बंद असतात, तेव्हा लक्ष विचलित होण्याची शक्यता कमी असते. एका विद्यापीठाने केलेल्या संशोधनानुसार ज्या व्यक्ती डोळे बंद करून प्रश्नांची उत्तरं देतात ती अचूक असतात. त्यामुळे विचार करताना डोळे बंद करा. या सरावामुळे स्मरणशक्तीदेखील वाढते.

■ स्वतःशी संवाद साधा : स्वतःशी बोलणं ही चांगली सवय आहे. लोक काय म्हणतील याचा विचार करू नका. याला प्रॉडक्शन इफेक्ट असं म्हणतात. ऐकणं आणि बोलणं या दोन कृती एकाच वेळी पार पडत असल्यामुळे स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते.

■ रक्तदाब तपासा : उच्च रक्तदाब असलेल्या लोकांना स्मरणशक्ती आणि विचार करण्याच्या प्रक्रियेशी निगडित समस्या उद्भवण्याची शक्यता असू शकते. अलाबामा युनिव्हर्सिटीच्या एका अभ्यासानुसार असं समोर आलं आहे की, उच्च रक्तदाबामुळे मेंदूला रक्तप्रवाह कमी होतो. परिणामी, स्मरणशक्ती कमी होते.

■ गाणी गुणगुणा : गाणं गाताना मेंदूचा उजवी बाजू वापरली जाते, त्यामुळे समस्येचं निराकरण करण्याची क्षमता वाढते. नवीन गाण्याचे शब्द लक्षात ठेवणं, कठीण असलं तरीही तो एक प्रकारचा व्यायाम आहे. त्या मेंदूला फायदा होतो.

■ ध्यानधारणा करणं फायदेशीर : दिवसातील पंधरा ते तीस मिनिटं ध्यानधारणा आणि योग करणाऱ्या व्यक्तींची स्मरणशक्ती उत्तम असते, असं एका अभ्यासातून समोर आलं आहे. यामुळे दृष्टिकोनात बदल होऊन सकारात्मक विचार करण्यास प्रेरणा मिळते. त्यामुळे अनेक मानसोपचारतज्ज्ञही ध्यानधारणा करण्याचा सल्ला देतात.

■ दैनंदिन कामांमध्ये करा बदल : काही ठराविक दिवसांनंतर दैनंदिन कामांमध्ये लहानसहान बदल करणं आवश्यक आहे. नेहमीपेक्षा वेगळ्या खुर्चीवर बसा, टीव्ही पाहताना जागा बदला किंवा दैनंदिन वापरातील वस्तूंची जागा बदला. असे काही बदल केल्यानं बराच फरक पडेल.

■ पेन्सिलचा वापर : ऐकताना किंवा काही पाहताना कागदावर रेघोट्या ओढण्याची सवय अनेकांना असते. अशा लोकांचा स्मरणशक्ती चाचणीत ३० टक्के अधिक उत्तम निकाल दिसून आला आहे. तसंच लिहिण्यानेही मेंदूचा व्यायाम होतो. त्यामुळे जो मजकूर लिहून काढतो तो अधिक चांगल्याप्रकारे लक्षात राहतो, असा अनेकांचा अनुभव आहे. त्यामुळे शक्य असल्यास लिहा. अर्थात, कीबोर्ड ऐवजी हातानं कागदावर लिहा. यामुळे मनातील भावनांना वाट मोकळी करून देता येईल.

■ झोप आणि आहार : नियमित सात ते आठ तासांची झोप घ्या. यानंतर आपल्या आहारामध्ये फळे, हिरव्या भाज्या आणि प्रोटीन इत्यादी पोषक घटकांचा समावेश होत आहे की नाही, याची काळजी घ्या. सकाळी उठल्यानंतर पौष्टिक अन्नपदार्थांचे सेवन करा. ओमेगा थ्री फॅटी ॲसिडचा समावेश असलेल्या पदार्थांचा डाएटमध्ये समावेश करा. सुकामेवा, अळशीच्या बिया इत्यादी. नियमित आठ ते नऊ ग्लास पाणी प्या.



# सडपातळ करणारे फूड कॉम्बिनेशन

**दहापैकी प्रत्येकी पाच माणसे तरी वजन वाढीच्या समस्येने त्रस्त असतात आणि या समस्येतून लवकरात लवकर बाहेर पडण्यासाठी ते विविध उपायसुद्धा वापरत असतात. तुम्हाला माहीत आहेच की वजनवाढीच्या समस्येला चुकीची आहारशैली कारणीभूत असते. सध्या पौष्टिक आहार सोडून चटपटीत आहार खाण्याकडे लोकांचा कल असतो आणि त्याचेच परिणाम वाढत्या वजनाने भोगावे लागतात. विविध उपाय वापरूनही तुमचे वजन कमी होत नसेल तर तुम्ही काट्याने काटा काढण्याचा उपाय अवलंबला पाहिजे. योग्य आहार घेऊन तुम्ही तुमचे वाढलेले वजन कमी करू शकता. चला जाणून घेऊया असे काही फूड कॉम्बिनेशन जे तुम्हाला तुमचे वाढलेले वजन कमी करायला मदत करतील.**

■ बदाम आणि सोया मिल्क : यूरोपियन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनानुसार बदामामध्ये मोठ्या प्रमाणात जीवनसत्त्व ई आणि हेल्दी फॅट आढळते. दर दिवशी ४३ ग्रॅम भाजलेले पदार्थ खाल्ल्यास वाढलेलं वजन वेगाने घटते. सोया मिल्क मध्येही प्रोटीन, जीवनसत्त्व आणि खनिज घटक असतात. हे सर्व घटक वजन नियंत्रित ठेवण्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असतात. म्हणून तुम्ही सुद्धा आवर्जून बदाम आणि सोया मिल्कचे सेवन करा आणि काही दिवसांतच तुम्हाला फरक दिसून येईल.

■ ग्रीन टी आणि मिंट : ग्रीन टीमध्ये कॅटेचीन नावाचे एक अँटीऑक्सिडेंट असते जे वजन वाढवणाऱ्या कोशिकांना नियंत्रित ठेवण्याचे काम करते. याशिवाय फॅट एनर्जीमध्ये रुपांतरित करण्यासाठी लिव्हरची क्षमता वाढवते. डिनरनंतर एक कप ग्रीन टी पिणे फायद्याचे असते. एका संशोधनात हे दिसून आले आहे की पेपरमिंट हे गॅस्ट्रोइंटेस्टाइनल समस्यांवर रामबाण असून या समस्या कमी करते. ज्यामुळे आतडे अधिक प्रभावीपणे कार्य करतात आणि वजन वाढू लागत नाही.

■ काबुली चणे आणि ऑलिव काबुली चणे : काबुली चणे आणि ऑलिव काबुली चण्यात पोषक तत्वे आणि शरीरात मिसळणारे फायबर घटक असतात. हे खाद्य वजन संतुलित राखण्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. यातून भूक कमी होणारे हार्मोन कोलेसिस्टोकिनिन रिलीज होतात. यामुळे सारखी सारखी भूक लागत नाही. काबुली चणे आरामात एक्स्ट्रा वर्जिन ऑलिव ऑईलमध्ये मिसळले जातात आणि सेरोटोनिनचा स्तर वाढवतात. यामुळे तुम्हाला जर वजन कमी करायचे असले तर हे कॉम्बीनेशन तुमच्यासाठी सर्वात उपयुक्त आहे.

■ पालक आणि ॲव्होकाडो: पालकमध्ये कॅलरी आणि कार्बोहाइड्रेट आढळते. वजन कमी करण्यासाठी याचा खूप फायदा होतो. ॲव्होकाडोमध्ये फायबर आणि हेल्दी फॅट आढळून येते. जर तुम्ही याचे रोज सेवन केले तर तुमच्या शरीराचे वजन योग्य प्रमाणात नियंत्रित राहील. अनेक जाणकार सुद्धा पालक आणि ॲव्होकाडोच्या सेवनाचा यामुळेच सल्ला देतात. जगभरात सुद्धा ज्यांना वजन कमी करायचे आहे ते पालक आणि ॲव्होकाडोने तयार होणाऱ्या डिशेस खाण्यावर भर देतात. त्यामुळे तुम्ही सुद्धा नक्कीच हे पदार्थ ट्राय करायला हवेत.

■ नाचणी आणि काश्मिरी मिरची पावडर : नाचणीमध्ये मोठ्या प्रमाणात ट्रिप्टोफॅन नावाचे अमिनो ॲसिड आढळते. याचे सेवन केल्याने जास्त भूक लागत नाही. वजन कमी करु इच्छिणाऱ्यांसाठी म्हणूनच नाचणी एक उत्तम पर्याय आहे. काश्मिरी मिरची पावडरमध्ये कैप्रीसिन नामक घटक असल्याने त्याच्या सेवनानेसुद्धा वजन नियंत्रणात राहते. आहारासोबत जर तुम्ही व्यायामावर व योगावर भर दिला तर तुम्हाला अधिक चांगले परिणाम दिसून येतील. वजन हे कधीच झटपट कमी होत नाही हे लक्षात ठेवा. ते कमी होण्यासाठी काही वेळ लागतो आणि तेवढा संयम तर तुमच्यात हवाच पण वजन कमी करण्यासाठी लागणारी मेहनत सुद्धा तुम्ही घ्यायला हवी. या सर्वांचा एकत्रित परिणाम झाल्यावरच तुम्ही वजन वाढीपासून सुटका मिळवू शकता.

# पहिल्या अन् दुसऱ्या बाळाच्या जन्मात किती अंतर असावं?

■ **सहा महिन्यांत दुसरे गरोदरपण असेल तर... :** ज्या महिला तिशीनंतर आई व्हायचा निर्णय घेतात त्यांच्याकडून ही चूक होण्याची शक्यता अधिक असते. कारण वाढत्या वयामुळे त्यांना दुसऱ्या बाळाच्या जन्माचा निर्णय लगेच घ्यायचा असतो. चाळीशीनंतर त्याची प्रजननक्षमता कमी होणार असल्यामुळे त्या सहा महिन्यांच्या आत दुसऱ्या बाळंतपणासाठी तयार होतात. मात्र हा निर्णय कोणत्याही स्त्रीच्या आरोग्यासाठी मुळीच हिताचा नाही. बाळंतपणामध्ये स्त्रीच्या शरीराची खूप झीज झालेली असते. शरीरात लोहाचे प्रमाण कमी असते. अशा वेळी दुसऱ्या बाळाच्या पोषणासाठी शरीर मुळीच सज्ज नसते. असा निर्णय घेतल्यास बाळ प्रिमॅच्युअर डिलिव्हरी, गरोदरपणात बाळाचे वजन कमी असणे अशा अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.

■ **दोन प्रेगन्सीमध्ये किती असावे अंतर... :** जर पहिल्या बाळाच्या जन्मानंतर तुम्हाला लगेच दुसऱ्या बाळाच्या जन्माचा निर्णय घ्यायचा असेल तर दोन प्रेगन्सीमध्ये काही ठराविक काळाचे अंतर असायला हवे. अशा वेळी तुम्ही अठरा ते तेविस महिने म्हणजेच दीड ते दोन वर्षांचे अंतर ठेवू शकता. कारण या काळात आईच्या शरीराची झालेली झीज पुन्हा भरून निघते आणि बाळ आणि आईसाठी दुसरे बाळंतपण सुखरूप ठरते. शिवाय जर तुमचं पहिलं मूल थोडं मोठं असेल तर तुम्ही तुमच्या दुसऱ्या बाळाचे गरोदरपण आणि त्याचे संगोपन योग्य पद्धतीने करू शकता. गरोदरपण आणि बाळंतपण हे खर्चिक निर्णय असल्यामुळे या दोन वर्षांत तुम्ही हे अतिरिक्त खर्च योग्य पद्धतीने नियोजित करू शकता.

# गुड इव्हिनिंग City

११ सप्टेंबर २०२६, शुक्रवार


# दुष्काळाच्या सावटात गणेशोत्सव अन् महालक्ष्मीच्या आगमनाची तयारी

**बुलढाणा, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** गणरायाच्या आगमनासह श्री महालक्ष्मी सणाचे दिवस जवळ येत असल्याने बुलढाणा शहरासह ग्रामीण भागात दुष्काळाच्या सावटात सण–उत्सवाची लगबग सुरू झाली आहे. गणेशोत्सव आणि महालक्ष्मी आगमनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठ सजली असून, ठिकठिकाणी गणेशमूर्ती, लक्ष्मीचे मुखवटे, मखर, खेळणी, विद्युत रोषणाई, पूजाविधीचे साहित्य तसेच सजावटीच्या वस्तूंचे स्टॉल थाटण्यात आले आहेत. गणेशमूर्ती निश्चित करण्यासाठी गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते बाजारपेठेत दाखल होत असून, महालक्ष्मीच्या मुखवट्यांसह सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी महिलांचीही मोठी गर्दी होताना दिसत आहे.

श्रावण महिना सुरू असून सण–उत्सवांची मालिकाच सुरू झाली आहे. गणेशोत्सव आणि महालक्ष्मी सणासाठी नागरिकांकडून तयारीला वेग आला आहे. शहरातील बाजारपेठेत विविध आकार, रंग आणि आकर्षक रूपांतील गणेशमूर्ती उपलब्ध झाल्या आहेत. लालबागचा राजा, सिद्धिविनायक, कोकणचा राजा, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, सिंहासनावर आरूढ गणपती, कमळावर विराजमान गणपती, बाल गणेश तसेच घरगुती गणेशमूर्ती अशा विविध स्वरूपातील मूर्ती ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. गणेशमूर्ती बरोबरच महालक्ष्मी आगमनासाठी आवश्यक असलेले विविध प्रकारचे मुखवटे, सजावटीचे साहित्य, रंगीबेरंगी मखर, आकर्षक लाईटिंग, पूजाविधीच्या वस्तू, रांगोळीचे साहित्य, खेळणी आदींचे स्टॉलही बाजारपेठेत ठिकठिकाणी लागले आहेत. त्यामुळे सध्या अंबाजोगाईच्या बाजारपेठेला व घाटनांदूर, बर्दापूर, ममदापूर या बाजारी गावात सणासुदीच्या वातावरणासह काही प्रमाणात यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यंदा महागाईचा परिणाम सण–उत्सवाच्या खरेदीवरही जाणवत आहे. गतवर्षीच्या तुलनेत गणेशमूर्ती, लक्ष्मीचे मुखवटे, खेळणी, मखर आणि सजावटीच्या साहित्याच्या किमतीत साधारणपणे १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. दुष्काळी परिस्थिती व वाढत्या महागाईमुळे सण साजरा करताना नागरिकांना वाढत्या खर्चाचा विचार करावा लागत आहे. असे असतानाही गणेशभक्तांमध्ये गणरायाच्या आगमनाचा उत्साह, तर गृहिणींमध्ये महालक्ष्मी सणाची तयारी करण्याची लगबग पहायला मिळत आहे.



# सावरगाव, सोनारगव्हाण शिवारातील खरीप पिके पावसाअभावी वाळण्याच्या मार्गावर

## तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्यांना मदतीची मागणी



**मेहकर, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील सावरगाव आणि सोनारगव्हाण शिवारात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांवर संकट ओढवले आहे. पावसाचा खंड वाढल्याने शेतातील पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके वाळण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी खरीप हंगामातील उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

सावरगाव आणि सोनारगव्हाण परिसरातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या सुरुवातीला पेरणी करून पिकांची जोपासना केली. मात्र, पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यातच पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी होत चालला असून पिकांना आवश्यक पाणी मिळत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे उभ्या पिकांची अवस्था दिवसेंदिवस खालावत असून उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर सावरगाव व सोनारगव्हाण शिवारातील शेतकरी वैभव विजयराव पाटील–निकम यांच्यासह इतर शेतकऱ्यांनी मेहकर तहसीलदारांकडे निवेदन सादर केले. पावसाअभावी झालेल्या पीक नुकसानीची तातडीने पाहणी करून संबंधित महसूल व कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत पिकांचा पंचनामा करण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. पावसाचा दीर्घ खंड पडल्याने शेतकऱ्यांनी केलेला लागवडीचा खर्च, बियाणे, खते, औषधे आणि मशागतीवर झालेला खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन प्रत्यक्ष शेतशिवारात पाहणी करावी आणि नुकसानीची नोंद घेऊन पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे.

निवेदनाच्या प्रती केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, मेहकर–लोणार विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय रायमुलकर, तालुका कृषी अधिकारी, मेहकर तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पावसाचा खंड आणखी वाढल्यास पिकांचे नुकसान गंभीर होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने विलंब न करता पंचनाम्याची कार्यवाही सुरू करावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# जागृती आश्रमाचे मठाधिपती शंकर महाराजांचे कार्य प्रेरणादायी : जिल्हाधिकारी प्रवीण देवरे



**खामगाव, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जागृती आश्रमाचे मठाधिपती शंकर महाराजांचे जनोद्धाराचे सामाजिक कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. अध्यात्मासोबतच पर्यावरण रक्षण आणि समाजसेवेसाठी त्यांचे योगदान उल्लेखनीय असून, जागृती आश्रमाचे कार्य समाजाला सकारात्मक दिशा देत येणाऱ्या काळात उज्ज्वल भविष्य घडवणारी पिढी देणारे आहे, असे गौरवोद्गार जिल्हाधिकारी प्रवीण देवरे यांनी काढले.

शेलोडी शिवारातील जागृती आश्रमाला जिल्हाधिकारी प्रवीण देवरे यांनी भेट देत शंकर महाराजांची भेट घेतली. यावेळी त्यांनी आश्रमाचा निसर्गरम्य परिसर, शांत वातावरण तसेच सुरू असलेल्या सेवाभावी कार्याची पाहणी केली. शंकर महाराजांच्या प्रकृतीचीही त्यांनी आस्थेने विचारपूस केली. शंकर महाराजांच्या परिश्रमातून साकारलेला जागृती आश्रम हा तप, सेवा आणि साधना या त्रिसूत्रीचा संगम असून, येथे अध्यात्मासोबत पर्यावरण संवर्धन आणि जन–सेवेचे कार्य सुरू आहे. आश्रमातील कार्याची माहिती घेतल्यानंतर जिल्हाधिकारी देवरे यांनी त्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील आणि तहसीलदार सुनील पाटील उपस्थित होते. जागृती परिवाराच्या वतीने जिल्हाधिकारी देवरे यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जागृती परिवारातील सदस्य उपस्थित होते.

# लाखनवाड्यात 'आयुष' आरोग्यसेवेचा महामेळावा; ५४८ रुग्णांवर मोफत उपचार

**खामगाव, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना भारतीय पारंपरिक चिकित्सा पद्धतींच्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत लाखनवाडा येथील ग्रामीण रुग्णालयात बुधवारी मोफत आयुष रोगनिदान व उपचार शिबिर घेण्यात आले. या शिबिरात तब्बल ५४८ नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक उपचार व औषधोपचार देण्यात आले. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्प–नेतून राष्ट्रीय आयुष अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा रुग्णालय आणि जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले. आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी तसेच योग व निसर्गोपचार या विविध उपचारपद्धतींची सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांना त्याचा लाभ मिळाला.

शिबिरात आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. सचिन चव्हाण व डॉ. गणेश हरणे, युनानी तज्ज्ञ डॉ. मोईन खान आणि होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. स्वाती धारस्कर यांनी रुग्णांची तपासणी केली. विविध आजारांवरील उपचारांसह पुढील उपचार, आरोग्यविषयक काळजी आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराचे आयोजन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजित मंडाले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. जिल्हा आयुष अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उपक्रमात प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना विविध आयुष उपचारपद्धती सहज उपलब्ध करून देणे, आजारांपासून बचावासाठी जनजागृती करणे आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हा शिबिराचा प्रमुख उद्देश होता. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा आयुष सल्लागार डॉ. मोहम्मद शफाअत, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. जुनेद इब्राहिम, सौरभ कुळकर्णी, रामेश्वर भोलाने तसेच ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.


## अनुसूची–५

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

अ) प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : निरंक

ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

क) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसुचनेचा तपशिल :- निरंक

टिप :- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मलकापुर येथे पाहता / निरीक्षण करता येईल.

दिनांक : २४/०८/२०२६
ठिकाण : बुलढाणा

(संतोष शिंदे)
उपविभागीय अधिकारी
तथा भूसंपादन अधिकारी मलकापुर

( डॉ. प्रविणकुमार देवरे)
जिल्हाधिकारी .बुलडाणा

जिमाका/बुल/जाहि/१४४/२०२६


पान क्र.२ वरुन

# खामगांव शहर व परिसरात पोळा सण उत्साहात साजरा



**खामगांव, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** शेतकऱ्यांसोबत शेतीत राबणाऱ्या त्यांच्या सुख दुःखात सोबत राहणाऱ्या सर्ज्या राजाचा सण म्हणजे पोळा. शेतीत सोने उगवण्यासाठी काबाड कष्ट करणाऱ्या आपल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पोळा सण शेतकरी बांधव थाटात साजरा करीत असतो.

खामगांव शहरातील फरशी या भागात सामुहिकरित्या पोळा भरत असतो. शहर व परिसरातील शेतकरी आपली बैलजोडी घेऊन फरशी येथे येत असतात व परंपरेनुसार सायंकाळी गुढीची पुजा करण्यात येत असते. सानंदा निकेतन येथेही समाजभुषण राणा गोकुलसिंहजी सानंदा यांनी सर्ज्या राजाची पुजा करुन नैवेद्य चढविला. माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा, माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा, माजी नगराध्यक्षा अलकादेवी सानंदा, सवितादेवी सानंदा यांनीही वृषभ राजाची पुजा करुन नैवेद्य दिला. यावेळी सानंदा परिवारातील सदस्य उपस्थित होते.


**GOVERNMENT OF MAHARASHTRA.**
VIDARBHA IRRIGATION DEVELOPMENT CORPORATION, NAGPUR
JIGAON PROJECT DAM & REHABILITATION DIVISION, SHEGAON
Email.eewpds@gmail.com Contact No. 07265-254688
BUDGETARY OFFER (FOR ESTIMATE PURPOSE ONLY NO. 01 FOR YEAR 2026-27 (IIrd Call)

Online budgetary offers are invited from Original manufacturers, Authorized Dealers / Contractors having experience of Instalation of Dam Instruments The dealer/ Contractors should upload his rates (including instalation) on Govt. Website https://mahatender.gov.in from Date.11.09.2026 Time 10.00 To 18.09.2026 18.00 Hrs. & T-1 Opening Date 21.09.2026 Time 11.00 Hrs. The rates of each should be inclusive of all transportation, freights charges and duties etc. complete. Rates must be excluding of GST and all taxes.
The Details of Budgetary Offers will be available on this website https://mahatenders.gov.in

**Please Note:-**
1) Work site location: Jigaon Project Tal. Nandura Dist. Buldhana
2) Budgetary offer is invited only for the estimation purpose. It does not give any assurance regarding tender or work.
3) Right to reject or cancel the quotation/quotations is reserved by the Executive Engineer, Jigaon Project Dam & Rehabilitation Division, Shegaon
4) The Bidder/Agency should have upload scanned copies of the similar type of work experience, handling minimum one order of above mention work in Government Sector. Official or unofficial sublated work will be considered. Work order and Work done certificate (should be certified by the officer not below the rank of Executive Engineer.), GST Registration Certificate, Pan Card etc. in Technical Envelope No.1 (T-1) and Envelope No.2 (Commercial Envelope) (C-1) Contains main Offer.

No. 4133/TC/AR-3/2026
Date:-10/09/2026
Office of the Executive Engineer,
Jigaon Project Dam & Rehabilitation Division,
Shegaon Dist.Buldhana

(P.S.Juneja)
Executive Engineer, Jigaon Project
Dam & Rehabilitation Division Shegaon

# यांत्रिकीकरणाच्या युगात सर्जा-राजाची संख्या आणखी घटली; भोरसा-भोरसी गावात आता केवळ ९० बैल



तालुक्यातील भोरसा-भोरसी गावातील बैलांची संख्या गेल्या काही वर्षांपासून सातत्याने घटत असून, सन २०२६-२७ मध्ये गावात केवळ ९० बैलांची नोंद झाली आहे. उत्साही शेतकरी रविंद्र कृष्णराव भुसारी यांच्या पुढाकारातून गेल्या ३६ वर्षांपासून गावातील बैलसंख्येची नोंद केली जात असून, या नोंदीतून पारंपरिक शेतीतील बैलांचे महत्त्व आणि त्यांची दिवसेंदिवस कमी होत चाललेली संख्या स्पष्टपणे समोर येत आहे.

भोरसा-भोरसी गावात पूर्वी शेतीच्या कामासाठी बैलजोडीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात होता. नांगरणी, वखरणी, पेरणी, मालवाहतूक यासह विविध शेतीकामे बैलांच्या माध्यमातून केली जात होती. मात्र, मागील काही वर्षांत ट्रॅक्टर, रोटाव्हेटर व अन्य आधुनिक कृषी यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्याने शेतीतील बैलांचा वापर कमी झाला आहे.

### ३६ वर्षांच्या नोंदीतून घट स्पष्ट

शेतकरी रविंद्र कृष्णराव भुसारी यांनी गेल्या ३६ वर्षांपासून केलेल्या नोंदी पाहिल्यास बैलांची संख्या सातत्याने कमी होत असल्याचे दिसून येते. सन १९९९ मध्ये भोरसा-भोरसी गावात ३२८ बैलांची नोंद होती. त्यानंतर सन २००४ मध्ये ही संख्या ३३२ वर पोहोचली होती. हा आकडा सर्वाधिक होता. मात्र, त्यानंतर बैलसंख्येत सातत्याने घट होत गेली.

यानंतरच्या नोंदीनुसार सन २०२३ मध्ये ९६, सन २०२४ मध्ये ९२ तर सन २०२५ मध्ये ८९ बैल होते. आता सन २०२६-२७ मध्ये ही संख्या १ ने वाढून ९० झाली आहे. अवघ्या काही वर्षांत बैलांची संख्या कमी होत असल्याने पारंपरिक पशुधन व्यवस्थेबरोबरच शेतीच्या नैसर्गिक पद्धतींच्या भवितव्याबाबतही चिंता व्यक्त होत आहे.

### यंत्रे वाढली, बैलांची संख्या घटली

आधुनिक शेतीमध्ये यांत्रिकीकरण अपरिहार्य झाले आहे. कमी वेळेत अधिक क्षेत्राची मशागत करण्यासाठी शेतकरी ट्रॅक्टर व आधुनिक साधनांचा वापर करीत आहेत. दुसरीकडे बैलांचे संगोपन करण्यासाठी लागणारा चारा, देखभाल व पशुवैद्यकीय खर्च वाढला आहे. त्यामुळे अनेक शेतकरी बैलजोडी ठेवण्याऐवजी यांत्रिक शेतीला प्राधान्य देत आहेत.

### बैल केवळ शेतीचा सहकारी नव्हे, शेणखताचा महत्त्वाचा स्रोत

बैलांचे महत्त्व केवळ शेतीची कामे करण्यापुरते मर्यादित नाही. पशुधनापासून मिळणारे शेण हे पारंपरिक व नैसर्गिक शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचे सेंद्रिय खत आहे. शेणापासून तयार होणाऱ्या शेणखतामुळे जमिनीत सेंद्रिय पदार्थ व सेंद्रिय कर्ब वाढण्यास मदत होते. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता, भौतिक गुणधर्म आणि सुपीकता सुधारण्यास सेंद्रिय खतांचा उपयोग होतो.

सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती आणि शाश्वत शेतीच्या दृष्टीने पशुधनाचे महत्त्व त्यामुळे अधिक वाढते. शेणखत, गोमूत्र व अन्य जैविक घटकांचा वापर केल्यामुळे जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यास मदत होते तसेच रासायनिक निविष्ठांवरील अवलंबित्व कमी करण्यास हातभार लागू शकतो. त्यामुळे बैलांची घटती संख्या ही केवळ ग्रामीण संस्कृतीच्या दृष्टीनेच नव्हे, तर पारंपरिक व सेंद्रिय शेतीच्या दृष्टीनेही चिंतेची बाब आहे.

### सेंद्रिय शेतीसाठी पशुधन महत्त्वाचे

आज रासायनिक खतांचा वाढता वापर, जमिनीची घटत चाललेली सुपीकता आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकरी सेंद्रिय व नैसर्गिक शेतीकडे वळत आहेत. अशा परिस्थितीत गावातील पशुधनाचे संवर्धन केल्यास शेणखताची उपलब्धता वाढून सेंद्रिय शेतीला आधार मिळू शकतो. त्यामुळे आधुनिक यांत्रिकीकरणासोबत पशुधन संवर्धनाचा समतोल साधणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### सर्जा-राजावरील प्रेम मात्र कायम

परंतु बैल हा केवळ शेतीचा सहकारी नसून ग्रामीण संस्कृतीचा आणि शेतकऱ्यांच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पोळ्याच्या दिवशी त्यांना सजवून, त्यांची पूजा करून शेतकरी आपली परंपरा जपत आहेत.

### आकडे चिंताजनक, पण परंपरा जपणे गरजेचे

गेल्या ३६ वर्षांच्या नोंदीतून बैलांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याचे स्पष्ट होत आहे. १९९९ मधील ३२८ वरून २०२६-२७ मध्ये ही संख्या ९० झाली आहे. त्यामुळे बदलत्या शेती पद्धतीसोबत पारंपरिक पशुधनाचे संवर्धन, शेणखताचा वापर आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्याची गरज निर्माण झाली आहे.

शेतीचे यांत्रिकीकरण झाले असले तरी बैलांशी असलेले शेतकऱ्यांचे नाते आजही कायम आहे. गेल्या ३६ वर्षांपासून घेतलेल्या नोंदीमुळे गावातील बैलसंख्येतील बदल डोळ्यासमोर येतो. बैलांपासून मिळणारे शेणखत हे जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी आणि सेंद्रिय शेतीसाठी उपयुक्त आहे. त्यामुळे भविष्यात बैलांची संख्या आणखी कमी होऊ नये, यासाठी पशुपालनाला प्रोत्साहन देणे व पारंपरिक पशुधनाचे संवर्धन करणे गरजेचे आहे, असे शेतकरी रविंद्र कृष्णराव भुसारी यांनी सांगितले.

सर्जा-राजाची संख्या घटली असली तरी पोळ्याचा उत्साह मात्र कायम असून, भोरसा-भोरसी गावात बैलसंस्कृतीसोबतच सेंद्रिय व शाश्वत शेतीची परंपरा जपण्याचा प्रयत्न आजही सुरू आहे.

गुड इव्हिनिंग City

**रविंद्र भुसारी, (एक शेतकरी)**

# अमृततर्फे ११ ते २६ सप्टेंबरदरम्यान 'विश्वबंधुत्व पंधरवडा'; संस्थांना सहभागी होण्याचे आवाहन

**बुलढाणा, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्वामी विवेकानंद यांनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो येथे जागतिक धर्म संसदेत केलेल्या ऐतिहासिक भाषणातून दिलेला सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, मानवता, परस्पर सन्मान आणि विश्वबंधुत्वाचा संदेश समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने ११ ते २६ सप्टेंबरदरम्यान 'विश्वबंधुत्व पंधरवडा' साजरा करण्यात येणार आहे.

सन २०२६ पासून दरवर्षी हा पंधरवडा आयोजित करण्यात येणार असून, बदलत्या सामाजिक व जागतिक परिस्थितीत सामाजिक ऐक्य, सहिष्णुता, परस्पर सन्मान आणि बंधुभावाची मूल्ये अधिक दृढ करण्यावर या अभियानात भर देण्यात येणार आहे.

पंधरवड्याचे प्रमुख आकर्षण असलेल्या 'शिकागो भाषण कृती कार्यक्रम' अंतर्गत स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो भाषणातील विचार समजून घेऊन ते दैनंदिन जीवनात आचरणात आणण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सहभागी संस्थांनी आपल्या स्तरावर स्पर्धा, चर्चासत्रे, व्याख्याने, जनजागृतीपर उपक्रम तसेच मूल्याधिष्ठित कार्यक्रम आयोजित करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी, युवक आणि नागरिकांमध्ये विश्वबंधुत्व, मानवता, सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या अभियानात शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच विविध खासगी आस्थापनांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेने केले आहे. प्रत्येक संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रानुसार उपक्रम आयोजित करून विद्यार्थी, युवक आणि नागरिकांचा अधिकाधिक सहभाग वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

अमृत संस्थेच्या माध्यमातून कौशल्य विकास, उद्योजकता, शैक्षणिक व आर्थिक प्रगती तसेच सामाजिक व सांस्कृतिक जाणीव वाढविणारे विविध उपक्रम राबविले जातात. समता, सामाजिक न्याय, बंधुत्व, सामाजिक ऐक्य आणि मानवता ही मूल्ये समाज-जीवनात अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने विश्वबंधुत्व पंधरवड्याचे आयोजन करण्यात येत आहे.

# महाराष्ट्रातील गुणवंत योगासनपटूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळावी, यासाठी प्रयत्न करणार : आमदार संजय गायकवाड

## सहकार विद्या मंदिर बुलढाणा येथे योगासन स्पर्धेचे शानदार उद्घाटन




आमदार संजय गायकवाड यांनी ७ व्या राज्यस्तर योगासन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी केले.

**बुलढाणा, ११ सप्टेंबर (गुड इव्हीनींग सिटी) :** महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन, बुलढाणा जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन तसेच सहकार विद्या मंदिर, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय योगासन स्पर्धा-२०२६ चे भव्य उद्घाटन गुरुवारी बुलढाणा येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.युवा पिढीमध्ये योग, शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक एकाग्रता, शिस्त आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. अशा स्पर्धांमधून ग्रामीण तसेच शहरी भागातील युवा खेळाडूंना व्यासपीठ मिळणे महत्त्वाचे आहे.महाराष्ट्रातील गुणवंत योगासनपटूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळावी, यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याची भूमिका व्यक्त केली.योगासन या क्रीडा प्रकाराला भविष्यात एशियन गेम्स तसेच ऑलिम्पिकमध्ये अधिकृत स्थान मिळावे, यासाठी मी विधानसभेत प्रश्न उपस्थित करून शासनाच्या माध्यमातून पाठपुरावा करणार असल्याचे आमदार संजय गायकवाड यांनी ७ व्या राज्यस्तर योगासन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी केले.

गेल्या सात वर्षांपासून योगासनात महाराष्ट्र जागतिक पातळीवर अव्वल स्थानी आहे. भारताने वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये मिळवलेल्या ११४ पदकांपैकी एकट्या महाराष्ट्राने तब्बल ४० पदके (४०% वाटा) पटकावली आहेत. राष्ट्रीय खेळ, 'खेलो इंडिया युथ गेम्स' आणि 'युनिव्हर्सिटी गेम्स' या स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या सर्वाधिक पदकांच्या तालिकेत योगासन खेळाचा वाटा सर्वात मोठा असल्याचे डॉ.संजय माल-पाणी यांनी ७ व्या सिनीयर महाराष्ट्र राज्य योगासन स्पर्धेचे प्रास्ताविकात सांगीतले.देशभराप्रमाणे महाराष्ट्रातही योगासन खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये ५ टक्के आरक्षण लागू करावे,अशी मागणी त्यांनी केली. महाराष्ट्रात योगासनाची मजबूत पायाभरणी बृहन्महाराष्ट्र योग परिषद, अमरावतीचे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आणि डॉ. अरुण खोडस्कर यांच्या योगदानामुळे शक्य झाल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगीतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलतांना राधेश्यामजी चांडक म्हणाले की, अनेक आजारांवरती औषधं तर गुणकारी असतेच, परंतु माणसाची जर प्रतिकारशक्ती वाढवायची असेल, तर तरी हा त्याला योगासनांशिवाय पर्याय नाही. आपण योगासनांचे प्रचारक आहात, जास्तीत जास्त योगाचा प्रचार करावा. हा प्रचार आपलं वैयक्तिक काम नसून, ते एक समाज-जीवनाचं, आध्यात्मिक जीवनाचं आणि या समाजाचं भलं होण्यासाठी तो एक महत्वाचे काम आहे. या पवित्र कामाचं एक आयोजन आपण आमच्या शाळेमध्ये केलं, याचा मला आनंद आहे. याप्रसंगी सहकार विद्या मंदीरच्या अध्यक्ष कोमलताई झंवर (चांडक),राज्याचे टेक्निकल डायरेक्टर सतीश मोहगावकर, राज्य संघटनेचे सचिव राजेश पवार जिल्हा योगासन असोसिएशनचे अध्यक्ष पुरुषोत्तम उपरवट, स्पर्धाप्रमुख संजय देशमुख. सहकार विद्या मंदिर बुलढाणा प्राचार्य अलगर सामी यांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वैशाली निकम,क्षितीज निकम यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू नितिन पवळे याने खेळाडू शपथ दिली,तर सहकार विद्या मंदीरच्या विद्यार्थ्यांनी योग गीत व नृत्य सादर करुन उपस्थितांचे स्वागत केले. संतुलन योगवर्गाच्या बाल योग साधकांनी रिदमीक योगा सादर करुन उद्घाटन कार्यक्रमात रंगत आणली. सुत्रसंचालन .गणेश सदाव्रते व दिपक वाघ यांनी केले. आभार महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव राजेश पवार यांनी मानले.याप्रसंगी अनेक क्रीडाप्रेमी व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रांतिक तैलिक महासभेच्या महिला जिल्हाध्यक्षपदी सुषमा राऊत चौथ्यादा निवड तर युवा आघाडीची धुरा तानाजी पैठणे यांच्याकडे







**साखरखेर्डा, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या बुलढाणा जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत महिला आघाडी व युवा आघाडीच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा जिल्हाध्यक्ष सुभाष देव्हडे यांनी नुकतीच केली. महिला जिल्हाध्यक्षपदी पत्रकार सुषमा राऊत यांची सलग चौथ्यांदा निवड करण्यात आली असून, युवा आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी तानाजी रामदास पैठणे यांची निवड करण्यात आली आहे. महिला जिल्हा उपाध्यक्षपदी अश्विनीताई क्षिरसागर यांची निवड जाहीर करण्यात आली.

बुलढाणा जिल्हा महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेची बैठक नुकतीच पार पडली. संघटनेचा विस्तार वाढविण्यासोबतच महिला व युवकांना संघटनेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे जोडण्यासाठी महिला आघाडी आणि युवा आघाडीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. महिला जिल्हाध्यक्षपदी चौथ्यांदा निवड झालेल्या सुषमा राऊत यांनी गेल्या अनेक वर्षांपासून महिला जिल्हाध्यक्षपदाची धुरा समर्थपणे सांभाळली आहे. त्यांच्या पुढाकारातून शेगाव येथे राज्यस्तरीय वधू-वर मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याच्या माध्यमातून अनेक रेशीमगाठी जुळल्या. तसेच बुलढाणा जिल्ह्यातील विविध गावांना भेटी देऊन त्यांनी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेची भूमिका समाजबांधवांसमोर मांडली असून, तेली समाजाला एका छताखाली आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. सुषमा राऊत यांनी नुकतेच वकिली व्यवसायातही पदार्पण केले आहे. उच्चशिक्षित असून प्रबोधन करण्याची प्रभावी हातोटी आणि सामाजिक प्रश्नांची जाण असल्याने त्यांनी समाजात आपला नावलौकिक निर्माण केला आहे. तसेच देऊळगाव राजा तालुका प्रतिनिधी म्हणून त्या गेल्या अनेक वर्षांपासून निर्भीडपणे पत्रकारिता करीत आहेत. त्यांच्या महिला जिल्हाध्यक्षपदी चौथ्यांदा झालेल्या निवडीमुळे संघटनेच्या महिला आघाडीला अधिक बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे. महिला जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झालेल्या अश्विनीताई क्षिरसागर यांचे वक्तृत्व प्रगल्भ असून, महिलांना संघटित करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा आणि कार्याचा संघटनेला लाभ होणार आहे. दरम्यान, युवा आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी बुलढाणा तालुक्यातील कोलवड येथील धडाडीचे कार्यकर्ते तानाजी रामदास पैठणे यांची निवड करण्यात आली. युवकांना संघटनेशी जोडण्यासोबतच समाजाच्या विविध प्रश्नांवर युवकांची प्रभावी भूमिका निर्माण करण्याची जबाबदारी आता त्यांच्या खांद्यावर आली आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी 'माटी के गणेश' उपक्रमाचे आयोजन

**खामगाव, ११ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी रोटरॅक्ट क्लब ऑफ खामगावच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'माटी के गणेश' या उपक्रमाच्या नवव्या पर्वाचे उद्घाटन उत्साहात झाले. यावेळी नगराध्यक्षा अपर्णा सागर फुंडकर यांनी शाडू मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्तींच्या प्रदर्शनाची पाहणी करून उपक्रमाचे कौतुक केले. गेल्या नऊ वर्षांपासून रोटरॅक्ट क्लबकडून हा उपक्रम सातत्याने राबविला जात असून, त्यातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती केली जात आहे. नागरिकांनी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करून पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला रोटरॅक्ट क्लबचे पदाधिकारी व सदस्य, पर्यावरणप्रेमी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

**My old Name -** Lavina Wasudeo Wadhwani

**My New Name -** Lavina Vasudev Wadhwani

**Address -** Wankhede layout,
near ganesh provision buldana,443001

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड चिखली, प्रो.प्रा. मोहित विजय गाडेकर, ता.चिखली जि. बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. कायदेशीर बाबी उद्भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAMAR/2012/46689